# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक विकाअ/शिक्षण/रँगिग/२०१५/1526

दिनांक :- 1 JUL 2015

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व पदवीका/पदवी/पदव्युत्तर पदवी

संस्था.

**विषय :- मा.सर्वोच्च न्यायालयाचे रँगिंग प्रतिबंध करण्यासंदर्भात दिलेल्या निर्णयाची अमलबजावणी करण्याबाबत.**

संदर्भ :- मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एनजीपी/२०१५/५३२ दिनांक १८ जुन २०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या पत्रासोबत उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मा.सर्वोच्च न्यायालयाचे रँगिंग प्रतिबंध करण्यासंदर्भात दिलेल्या निर्णयाची अमलबजावणी करण्याबाबतचे परीपत्रक क्रमांक याचिका २०१० प्र/क्र ३२८/विशि ३ दिनांक ४ जुन २०१५ चे पत्र जोडलेले आहे. त्यामध्ये दिलेल्या सुचनाप्रमाणे आपल्या स्तरावर कार्यवाही व्हावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

करण्यासंदर्भात दिलेल्या निर्णयाची
अंमलबजावणी करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
परिपत्रक क्र. याचिका २०१०प्र/.क्र.३२८/विशि-३
मंत्रालय विस्तार.४०००३२ –मुंबई
**दिनांक: ०४ जून २०१५.**

**वाचा:-** १.केरळ विद्यापीठ विरूध्द कौन्सिल,प्रिन्सिपॉल्स,कॉलेजेस,केरळा ॲन्ड इतर या स्पेशल लिव्ह अपिल (Civil) क्रमांक २४२९५/२००४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले दिनांक १६ मे २००७ चे अंतरिम आदेश

२.रॅगिंग प्रतिबंध संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१८ मे २००७ रोजी दिलेले निर्देश

३.शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण -२००५/(२३८/०५)/विशि-१, दि.१८.०७.२००७

४.मा.सर्वोच्च न्यायालयाचे सी.ए.क्रंमांक ८८७/२००९ मधील आदेश दि.२२.०६.२००९

५.मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे जनहित याचिका क्रं.१७२/२०१० मधील आदेश दि.२७.०२.२०१५

**परिपत्रक-:** शालेय स्तरावरून महाविद्यालयात प्रवेश घेणा-या नवीन विद्यार्थ्यांचे , विशेषत: अन्य गावातून आलेल्या विद्यार्थ्यांचे त्यांचेपेक्षा वरील वर्गातील विद्यार्थ्यांकडून होत असलेल्या रॅगिंगमुळे मानसिक स्वास्थ खराब होण्याच्या वारंवार घटना घडतात. अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर होतेच परंतु आत्महत्येसारख्या घटनाही घडू शकतात.

वरील बाबींचा सर्वकष विचार करून मा.सर्वोच्च न्यायालयाने संदर्भ क्रं.२ अन्वये दिलेल्या सूचनांची कडक अंमलबजावणी करण्याबाबत शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण -२००५/(२३८/०५)/विशि-१, दि.१८.०७.२००७ अन्वये सर्व संबंधित विभाग, संचालक, सहसंचालक, सर्व विद्यापीठाचे कुलगुरू,कुलसचिव,शालेय शिक्षण विभाग,वैद्यकीय शिक्षण विभाग.कृषी शिक्षण विभाग यांना सूचना देण्यात आल्या होत्या.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, रॅगिंग प्रतिबंधाची योग्य अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून खालील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१. रॅगिंग सारख्या गुन्ह्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून देण्यात येणारी शिक्षा कडक असावी, जेणे करून इतरांना दहशत बसेल.

२. रॅगिंगच्या प्रत्येक घटनेमध्ये संस्था स्तरावर करण्यात आलेली कार्यवाइ जर संबंधित विद्यार्थ्याला (Victim) किंवा संस्थेच्या प्रमुखाला समाधानकारक वाटत नसेल तर कोणताही अपवाद न करता संस्थेच्या प्रधिका-यांनी स्थानिक पोलिसांकडे F.I.R. दाखल करावा.बळी पडलेल्या विद्यार्थ्याच्या पालकांना पोलिसांमध्ये परस्पर F.I.R. दाखल करावायाचा असला तरीही संस्थेच्या प्राधिका-यांनी F.I.R. दाखल करणे आवश्यक राहील.

३. शैक्षणिक संस्थेकडून प्रवेशासाठी छापलेल्या पुस्तिकेमध्ये (Prospectus) असे स्पष्टपणे नमूद करावे की, प्रवेशासाठी येणारा विद्यार्थी यापूर्वी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला असेल तर त्याला प्रवेश नाकारण्यात येईल वा प्रवेश दिल्यानंतरही असे निदर्शनास आले की, सदर विद्यार्थी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला होता तर त्याला निष्काशित करण्यात येईल.

पत्र प्राप्त झाले
6 JUN 2015
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १

तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
आवक क्र. ९८५९७
दिनांक ०८/०६/१५

मा सहसंचालक यांचे निदर्शनास आणावे

सहसंचालक वि.का. व संस्थाप्रमुखांनी परिपत्रक पाहून त्यातील दिशानिर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे